परिवहन समितीच्या बुधवार दि. 21/03/2018 रोजी दुपारी 12:00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सदस्य

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | सभापती |
| 2 | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 3 | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 4 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 5 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 6 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 7 | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 8 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 9 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 10 | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |

## अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 2 | मा. सौ. विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 3 | मा. श्री. विरेन्द्र घनश्यामदास कुकरेजा<br>सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | श्री. शिवाजी जगताप | परिवहन व्यवस्थापक |
| 2 | श्री. हरिश दुबे | निगम सचिव |

मा.सभापती, यांनी परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

सुरूवातीला मा.सदस्या श्रीमती अभिरूची राजगिरे, मा.सदस्या श्रीमती अर्चना पाठक, मा. सदस्या श्रीमती कल्पना कुंभलकर या 3 समिती सदस्यांची स्थायी समितीमध्ये सदस्य म्हणून निवड झाल्याबद्द्ल अभिनंदन करण्यात आले. तसेच मा.सभापती, स्थायी समिती श्री. विरेन्द्र कुकरेजा यांनी परिवहन समितीतील पदेन सदस्य झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.

<u>ठराव क्रमांक ४४</u> :— परिवहन विभाग मनपाचे आर्थिक वर्ष २०१७—१८ मध्ये NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅंक ऑफ महाराष्ट्र च्या Current Account मध्ये सुरूवातीच्या शिल्लकीसह माहे. ऑक्टोबर २०१७ ते डिसेंबर २०१७ पर्यंत रु. १९,०५,७६,३६३/— हा एकूण तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी माहे. ऑक्टोबर २०१७ ते डिसेंबर २०१७ पर्यंत रु. ३१,१४,४७,४९९/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत एकूण खर्च झाला आहे. या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समिती समक्ष सादर करुन व मान्यता प्राप्त करुन कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ४५</u>:— परिवहन विभाग, मनपा चे आर्थिक वर्ष २०१७—२०१८ मध्ये मनपा निधीतुन रु. १०८ कोटी निधी मंजुर करण्यात आला असुन NMC The City Of Nagpur Transport Fund, या बॅंक ऑफ महाराष्ट्र, सिव्हील लाईन्स नागपूर च्या माहे जानेवारी २०१८ रु. ६,५७,१०,४७०/— तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी जानेवारी २०१८ एकुण रु. ८,७०,०७,२९१ हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समिती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री.प्रविण भिसीकरः— मा. सभापती महोदय, जानेवारी 2018 रेडबसच्या माध्यमातून 53 कोटी 97 लाख 4284 रूपयाचे उत्पन्न झाले. तर या कालावधीत ऑपरेटरला 101 कोटी 97 लाख 86 हजार 465 रूपयाचे भुगतान करण्यात आले आहे. म्हणजेच परिवहन विभागाला 48.82 कोटीचा तोटा झाला आहे. महानगरपालिकेची शहर बससेवा तोटयात आहे. ही तुट कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी परिवहन विभागातर्फे एस्क्रो खाते उघडण्यात येणार आहे. कंपनीच्या कामाची देय रक्कम महापालिका प्रत्येक तीन महिन्यात देते. मात्र कंपनीला देय रक्कम दिल्यानंतर रकमेच्या मंजुरीचा प्रस्ताव आणल्या जातो. कंपनीचा हिशेब प्रत्येक महिन्यात चुकता झाला तर झालेला तोटा कमी करण्यासाठी सविस्तर चर्चा करता येईल. एस्क्रो खाते उघडल्यास कंपनीला देय रकमेसाठी आधी मंजूरी घ्यावी लागेल. खात्याकरिता किमान 60 कोटी रक्कमेची आवश्यकता आहे. शासनाकडून हा निधी प्राप्त झाला तर परिवहन व्यवस्था सुधारेल. याबाबतचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात यावा. एस्क्रो खाते राहिल्यास ऑपरेटरांवर एकप्रकारे वचक ठेवण्यास मदत होईल वंश निमय यांच्याकडे शहर बसची जबाबदारी असतांना दररोज 1 लाख 60 हजार प्रवासी प्रवास करीत होते. आता तीन—तीन ऑपरेटर लावूनही अंदाजित 1 लक्ष 77 हजार प्रवासी संख्या आहे. आपल्या विभागातर्फे पॅसेजर वाढविण्यासाठी काय काय उपाययोजना केल्या जात आहे.

परिवहन व्यवस्थापकः— मा.सभापती महोदय, ज्या मार्गावर कि.मी.प्रमाणे उत्पन्न कमी आहे या कमी उत्पन्न असणा—या मार्ग तपासण्यासाठी व्हिजीबल स्टॉफ तयार केले आहे त्यांच्यामार्फत तपासणी करण्यात येत आहे. बसमध्ये सुमारे 10 टक्के प्रवासी प्रवास करतात असा अंदाज असून

प्रवाशांपैकी 4 ते 6 टक्के म्हणजेच 8 ते 9 हजार प्रवासी विना तिकीट प्रवास करतात. वाहकाद्वारे चोरी होत असते परंतु ती दिसून येत नाही. विना तिकीट प्रवासी प्रवास करीत असतात.

श्री.प्रविण भिसीकरः– मा. सभापती महोदय, विना तिकीट जवळपास 5 हजार प्रवासी प्रवास करीत असतील तर यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी डिम्स् या ऑपरेटकर कडे असतानाही कराराच्या अटीशर्तीनुसार कारवाई कां होत नाही. कंपनीसोबत महापालिकेचा प्रतिदिवस 1 लक्ष 75 हजार प्रवाशांचा करार करण्यात आला त्यामुळेही परिवहन विभागाला प्रतिमहिना साडेचार कोटीचा तोटा होतो. प्रवाशांची संख्या चार लाखांवर गेली तरच परिवहन सेवा ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणे शक्य होईल.

सभापतीः–परिवहन विभागातील अधिकारी आणि कर्मचा–यांनी विशेष लक्ष घालून त्वरित उपाययोजना सुरू कराव्यात. प्रतिदिन प्रति प्रवासी किती प्रवास करतात त्यातुन उत्पन्न किती होते याची परिवहन समितीच्या सर्व सदस्यांना माहिती देण्यात यावी.

**(तद्नंतर मा.सभापती यांची तब्येत बरी वाटत नसल्या कारणाने त्यांनी मा.उप सभापती श्री.प्रविण भिसीकर यांना पदभार सोपविला.)**

<u>ठराव क्रमांक ४६</u>:– परिवहन विभाग, मनपा चे आर्थिक वर्ष २०१७–१८ मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूर च्या Current Account मध्ये माहे फेब्रुवारी–२०१८ रू. ४,६३,४८,८१५/–तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी फेब्रुवारी – २०१८ एकूण रु. ८,२४,४६,४५३/–हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे.
या खर्चाचा लेखा–जोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री.नितीन ग्वालबंशीः– मा.सभापती महोदय, परिवहन विभागाचा लेखाजोखा कोणत्या अधिका–याकडे येते. आपल्या विभागाचे बजेट तयार करण्याचे काम आणि त्याला पाहण्याचे काम कोणत्या अधिका–याकडे येते ते सांगण्यात यावे.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.सभापती महोदय, महानगरपालिकेच्या परिवहन विभागाचे स्वतंत्र बजेट असून महानगरपालिकेच्या अधिनियमानुसार ते करण्यात आले आहे. परिवहन विभागाचे बजेट तयार करण्याची जबाबदारी परिवहन विभागाची आणि परिवहन व्यवस्थापकाची आहे. 2017–18 या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिकेचे आर्थिक बजेट सादर झालेले होते परंतु आता या आर्थिक वर्षाकरिता 2018–19 चे बजेट तयार झालेले आहे ते आपण सादर करणार आहे. परिवहन विभागाचे स्वतंत्र बजेट परिवहन विभागामार्फत प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, आयुक्त यांच्या मान्यतेनुसार समितीसमक्ष सादर करते.

श्री.नितीन ग्वालबंशीः– मा.सभापती महोदय, माझे स्वःतचे मत आहे की परिवहन समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न प्रशासनामार्फत होत आहे आणि ही गंभीर बाब आहे. कारण हे स्वतंत्र बजेट आहे त्याला लेखा अधिकारी किंवा जे बजेट बनवितात ते बजेट बनविण्याकरिता सक्षम

आहेत काय? मला हे उत्तर पाहिजे आहे की ते सक्षम अधिकारी आहेत काय? लेखा अधिकारी हे पद किमान बजेट तयार करण्याकरिता आवश्यक आहे. कृपया प्रशासनाकडून उत्तर देण्यात यावे.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.सभापती महोदय, बजेट बनविण्यासाठी माझी टीम आहे. माझ्याकडे त्यांच्याकडून आकडा येतो. तो आकडा आयुक्त महोदयांकडे पुटअप करतो त्यानंतर समितीकडे पुटअप करण्यात येते.

श्री.नितीन ग्वालबंशी:– मा.सभापती महोदय, टीममध्ये कोण आहे, नाव सांगावे.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.सभापती महोदय, विभागाचे आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर परिवहन विभागात लेखा अधिकारी म्हणून भारद्वाज हे राज्यसेवेतून निवृत्त झालेले निवृत्त अधिकारी आलेले आहेत. बजेट तयार करीत असतांना सिव्हिल इंजिनिअर, वाहतुक यांची मदत असते. संपुर्ण विभागाचा सहभाग झाल्यानंतर प्रत्येक आय आणि व्ययाचा अंदाज कुठेतरी परफेक्ट राहील. या हिशेबाने आय आणि व्ययासाठी एक–एक विषय घेवून तयार करण्यात येतो. ॲक्टनुसार परिवहन व्यवस्थापकाचे पद दिले आहे. माझी संपुर्ण टीम, ॲकाऊंट सेक्शन अधिकारी, प्रत्येक प्रशासकीय अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, वाहतुक व्यवस्थापक, विभागीय अभियंता या सर्वांचा सहभाग असतो. जेथे जेथे आय आणि व्ययाचा प्रश्न येतो असतो त्याकरिता विभागामार्फत संयुक्तिक बैठका घेत असतो. मागच्या बजेटमध्ये 30–35 बैठका झाल्या होत्या. प्रशासकीय अधिकारी सुध्दा होते त्यावेळी सातत्याने रिव्हू घेतला होता. बजेट हे हळूहळू परिपक्व होत जाते. त्यामुळे हे बजेट अधिक सुधारित बजेट राहील. लेखा अधिकारी सक्षम अधिकारी आहेत. राज्य सेवेत 30 वर्षाची सर्विस केल्यानंतर ते निवृत्त झालेले आहे.

श्री.नितीन ग्वालबंशी:– मा.सभापती महोदय, लेखा अधिकारी यांची नियुक्ती कायद्याच्या अनुसार झालेली आहे काय? त्यांना जाहिरातीनुसार घेण्यात आले आहे काय? याचे उत्तर देण्यात यावे.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.सभापती महोदय, लेखा अधिकारी यांची नियुक्ती मुळातच प्रलेविवि विभागात झालेली आहे. आपण लेखा अधिकारी आणि लेखापाल यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. भारद्वाज यांची नियुक्ती प्रलेविवि विभागाकडून आमच्याकडे करण्यात आली. परिवहन विभागाचा आकृतीबंध नसल्यामुळे जेएडी विभागामार्फत करण्यात आली.

श्री.नितीन ग्वालबंशी:– मा.सभापती महोदय, माझी अशी मागणी आहे. माझे असे मत आहे की ही नियुक्ती जाहिरात करून करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्वरित त्यांना पदमुक्त करण्यात यावे आणि नवीन कंत्राट पध्दतीने पद नियुक्तीची जाहिरात करून पद नियुक्ती करण्यात यावी तोपर्यंत दुसरा सक्षम अधिकारी नियुक्त करावा अशी माझी विनंती आहे.

श्री.प्रविण भिसीकर(उप सभापती):– नितीनजी ग्वालबंशी आपण मागच्या बैठकीमध्ये नव्हता. ही जी प्रक्रिया झालेली आहे.

श्री.नितीन ग्वालबंशी:– मा.सभापती महोदय, जेव्हा ही नियुक्ती जाहिरातीच्या माध्यमातून झालेली नाही आणि माझे स्पष्ट मत आहे आणि आरोपही आहे. ज्या पध्दतीने परिवहन विभागाच्या बजेटमध्ये एवढा तोटा दिसत असतांना काहीही सुचना न करता वारंवार तशाच पध्दतीचे बजेट येत असेल तर सक्षम अधिका–याची नियुक्ती जाहिरातीनुसार झाली नसल्यामुळे आपण

कायद्यानुसार त्यांना पदमुक्त करावे तोपर्यंत पर्यायी व्यवस्था म्हणून त्यांना ठेवण्यात यावे. जाहिरात काढून हे पद नियमानुसार भरण्यासाठी त्याचा पाठपुरावा केला पाहिजे आणि नियुक्ती केली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

श्री.प्रविण भिसीकर(उप सभापती):– नविन कोणताही व्यक्तिची नियुक्ती केली तर त्याला 222 कोटीचा बजेटचा विषय लवकर कळणार नाही. आधीच घोळ झालेला आहे त्यात आणखी घोळ होण्याची शक्यता आहे. एक महिन्याच्या कालावधीनंतर त्याचा फेरविचार आपण करू.

श्री.नितीन साठवणे:–मा.सभापती महोदय, याच्याशी मी सहमत आहे. विभागाचा तोटा कसा कमी करता येईल याकरिता विभागातर्फे सजेशन आले पाहिजेत. विभागामार्फत कोणतेही सुझाव दिले जात नाही. 2019 पर्यंत मेट्रो सुरू होवू शकते या अनुषंगाने परिवहन विभागाचा तोटा वाढणार आहे त्यावर काय उपाययोजना करणार आहे. त्याचे सुध्दा आकलन करून त्याप्रमाणे पुढचे बजेट घ्यावे अशी माझी सुचना आहे.

श्री.प्रविण भिसीकर(उप सभापती):–मा.सदस्यांनी जे सांगितले त्यावर विचार करणे आवश्यक आहे.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.सभापती महोदय, बजेटकरिता आय व्ययकाचा अंदाज घेवून प्रत्येक महिन्यात स्पेसिफिकेशन आणि कारणमीमांसा केलेली आहे. मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांची निश्चितपणे नोंद घेण्यात येईल.

श्री.प्रविण भिसीकर(उप सभापती):–वातानुकूलित ग्रीनबसचे संचालन फेब्रुवारी 2017 पासून सुरू झाली. जानेवारी 2018 पर्यंत तिकीट विक्रीच्या माध्यमातून 73 लक्ष 99हजार 887 रूपये महानगरपालिकेला उत्पन्न प्राप्त झाले. स्कॅनिया कंपनीकडे ग्रीनबसचे संचालन आहे त्यापोटी कंपनीला उपरोक्त कालावधीत 1 कोटी 21 लाख 6 हजार 448 रूपयाचे भुगतान करण्यात आले. अर्थातच 47 लाख 6 हजार 561 रूपये इतका तोटा झाला. ग्रीनबसेसचे तिकीट जास्त आहे. ग्रीनबसेसकरिता पॅसेंजर वाढवावे लागतील. ग्रीनबस मध्ये विद्यार्थ्यासाठी पास सुविधा करण्यात यावी आणि बसच्या भाडयात कपात करण्यात यावी. शाळा कॉलेजेस् ज्या रूटवरती आहेत त्या रूटवरती बसेस चालविण्यात यावे त्यामुळे आपले उत्पन्न वाढणार आहे. नियमानुसार प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये 10 दिवसाकरिता स्टॉल लावून ग्रीनबसमध्ये मिळणा–या सुविधांचा प्रचार व प्रसार कसा करता येईल अशाप्रकारचे विभागामार्फत काही सुझाव असतील ते कार्यान्वित करण्यात यावेत.

<u>ठराव क्रमांक ४७</u>:– नागपूर शहरबस संचालनात महानगरपालिका मार्फत मे. ट्रॅव्हलटाईम काररेन्टंल प्रा. लि., मे. आर. के. सिटी, बस ऑपरेशन प्रा. लि., व मे. स्मार्ट सिटी बस सर्व्हीसेस, प्रा. लि., हया ०३ रेड बस ऑपरेटरची नियुक्ती जी.सी.सी. तत्वावर करण्यात आलेली आहे. हया ०३ रेड बस मालकीचे १५० नविन रेडमिडी बस (प्रत्येकी ५० प्रमाणे) व मनपा मालकीचे २३७ रेड स्टॅन्डर्ड बस (प्रत्येकी ७९ प्रमाणे) असे एकूण ३८७ रेड बसेस नागपूर शहरात संचालित करयाचे नियोजन आहे. त्यापैकी सध्या ३५३ रेड बसेस संचालित होतआहे.

मंजूर आर.एफ.पी. व करारानुसार जी.सी.सी. तत्वान्वये मंजूर प्रति कि.मी. दर व सी.पी.आय./डब्ल्यु.पी.आय. मध्ये वाढ झाल्याने प्रति कि.मी. दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | रेड बस प्रकार | आर.एफ.पी. प्रमाणे प्रति कि.मी. | वाढीव दर |
|---|---|---|---|
| १) | नविन रेड मिडी बस | ४५/— | ४७.९०/— |
| २) | मनपा मालकी चे रेड बस (स्टॅन्डर्ड) | ४९/— | ५२.१६/— |

नागपूर शहर रेडबसचे संचालन सध्या प्रादेशिक परिवहन अधिकारी नागपूर (शहर) यांचे मंजूरीने दि. ०८/०९/२०१४ पासुन प्रति ०२ कि.मी. चा एक टप्पाकरीता रू. ०८/—ची आकारणी करण्यात येत आहे. म्हणजे ०३ वर्ष ०२ महिनेपुर्ण झालेले आहे.

उपरोक्त नमुद ०३ रेड बस ऑपरेटर मार्फत दि. ०५/१२/२०१६ पासुन ‘‘ट्रायलरन’’ म्हणून शहरबस संचालनाचे कार्यसुरू करण्यात आले व नंतर दि. ०१/०३/२०१७ पासुन पुर्णत: संचालनाचे कार्यसुरू झाले. माहे. डिसे. २०१६ ते जाने. २०१८ पर्यंत तिकीट व पास विक्री मार्फत प्राप्त उत्पन्न व जी.सी.सी. तत्वानुसार ०३ रेड बस ऑपरेटर चाकरण्यात आलेले भुगतानची माहिती खालील प्रमाणेआहे.

१) दि. ०५/१२/२०१६ ते ३१ जाने. २०१८ पर्यंततिकीट व पासेस द्वारे प्राप्त उत्पन्न रू. ५३,९७,०४,२८४/—

२) दि. ०५/१२/२०१६ ते ३१ जाने. २०१८ पर्यंत ०३ रेड बस ऑपरेटरचा रू. १०१,९७,८६,४६५/—चे भुगतान करण्यात आले.

३) तोटा रू. ४८,००,८२,१७८/—

शहरबस संचालनात नेहमी तोटा होत आहे व महानगपालिकाची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्याने नेहमी शहरबस ऑपरेटरचा मासिक भुगतान करतांना नेहमी अडचण होत आहे. सदर तोटा काही प्रमाणात कमी करण्याकरीता प्रति ०२ कि.मी. च्या एका टप्प्यात ०८/— रेटमध्ये वाढ करून रू. १०/— करणे आवश्यक आहे. म्हणजे काही प्रमाणात तोटा कमी होईल. हया पुर्वी म्हणजे ०३ वर्ष ०४ महिनेपुर्वी (दि. ०८/०९/२०१४) शहरबसची भाडेवाढ झाली होती. हयाबाबींचा विचार करून रेड शहरबसचे प्रवास भाडयात वाढकरणेबाबत चे प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून ही भाडेवाढ असल्याने व भाडेवाढ ही डिझल दरवाढीशी संबंधित असून तिकीट वाढ झाल्याने विद्यार्थी पासेसचे देखील दर वाढतील, करिता याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी डिझेल बसचे भाडेवाढ प्रस्तावास महासभेपुढे सादर करण्यात यावा अशी समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ४८</u>:— नागपूर शहरबस संचालनात मनपा मार्फत मे. स्कॅनिया व्हीकल प्रा. लि. हया कंपनीचे मालकी चे ५५ वातानुकुलीत ग्रीन बस (इथेनॉल इंधन संचालित) द्वारे संचालनाची मंजूरी जी.सी.सी. आधारावर देण्यात आलेली आहे. व त्याकरीता सदर ऑपरेटरला रू. ८५/—प्रति किमी हया दराने मनपा द्वारे प्रतिमाह भुगतान करावयाचे आहे.

सदर दरामध्ये भविष्यात वाढसुध्दा होण्याची शक्यता आहे. (सी.पी.आय. व डब्लु.पी. आय. मध्ये वाढ झाल्यास) सध्या मे. स्कॅनिया व्हीकल प्रा. लि. हया कंपनी मार्फत सध्या २५ नविन वातानुकुलीत ग्रीन बसचे संचालन हिगंणा, डिफेनस, कन्हाण, बुटीबोरी, मिहान, बेसा, पिपळाफाटा, बहादुराफाटा हया मार्गावर होत आहे. सदर बसचे संचालनात प्रति ०२ किमीच्या एकाटप्प्यात रू. १४/—प्रवासभाडे प्रवासाकडून तिकीट विक्रीचा अनुषंगाने वसुल करण्यात येत आहे.

सदर बसचे संचालन माहे. फेब्रुवारी २०१७ पासुन सुरू आहे. परंतु अपेक्षित प्रवासी व उत्पन्न मिळत नसल्याने मे. डीम्टस (आय.बी.टी.एम.) ऑपरेटर मार्फत प्रवाशी सर्वे करण्यात आला. त्यात बरेच प्रवाश्यांनी रेडबसचे भाडे पेक्षा प्रति ०२ किमी टप्प्यात रू. ०६/—जास्त भाडे असल्याचे नमुद केले आहे. तसेच काही खाजगी संस्था द्वारे प्रवास भाडे कमी करण्याबाबत सुचना प्राप्त झालेले आहे. वातानुकुलीत ग्रीनबस चे संचालन माहे. फेब्रु. २०१७ पासुन सुरू झाले असून माहे. जाने. २०१८ पर्यंत तिकीट विक्री द्वारे एकूण रू. ७३,९९,८८७/—मनपास प्राप्त झाले असून सदरबस चे ऑपरेटरला रू. १,२१,०६,४४८/— जी.सी.सी. तत्वावर भुगतान करण्यात आलेले आहे. म्हणजे एकूण रू. ४७,०६,५६१/—चा तोटा झालेला आहे. तसेच माहे. जाने. २०१८ मध्ये सरासरी १८००.७७ प्रतिदिन प्रवासी यांनी प्रवास केला असून सरासरी प्रतिदिन २१५.८४ फेऱ्या पुर्ण झालेले आहे. म्हणजे प्रति दिन प्रति फेरी फक्त ०८.३४ प्रवासी प्रवास करीत आहे. प्रवासी भाडे कमी झाल्यास प्रवासी संख्येत वाढ व पर्यायाने उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. म्हणून परिवहन विभाग, मनपातर्फे प्रति ०२ किमी च्या टप्प्यात रू. १४/— ऐवजी रू. १२/—प्रवासभाडे आकारणी प्रायोगिक तत्वावर (विशेष सुट Special Discount) करणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

वातानुकुलीत ग्रीन बसचे प्रवास भाडे प्रायोगिक तत्वावर (विशेष सुट)Special Discount) कमी करणेबाबत चे प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून प्रथम सुमारे ३ महिन्यांच्या कालावधीकरिता दिनांक ३०.०६.२०१८ पर्यंत प्रायोगिक तत्वावर या भाडे आकारणीवर ग्रीन बस सेवा चालविण्यात यावी व दिनांक ६. ०४.२०१८ ते दिनांक ३०.०६.२०१८ या कालावधीतील प्रवासी प्रतिसादाचे फलनिष्पत्ती व परिणाम याची तपासणी करून परिवहन समितीमार्फत भाडे आकारणी निश्चित करण्याचा प्रस्ताव महासभेपुढे पाठविण्यात यावा अशी समितीने एकमताने शिफारस केली.

<u>ठराव क्रमांक 49:—</u> आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
परिवहन समिती
महानगरपालिका,नागपूर